MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta
UGC Approved Refereed Journal
Jr No. 62759

# विद्यावार्ता®

International Multilingual Research Journal

Issue-22, Vol-06 April to June 2018



330

Scanned by TapScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
April To June 2018
Issue-22, Vol-06


http://www.vidyawarta.blogspot.com | https://sites.google.com/site/vidyawartajournal

## || Index ||

01) SCIENTIFIC LITERATURE ANALYSIS OF JUDO
Dr. Bhagwat vinayak Bajirang || 09

02) Impact of the Communication Sector in Indian Economy
Dr. H.S.Bhatiya, Prof. Shaikh Tasleem Ahmad || 13

03) Current Trend in Business Process Outsourcing (BPO) : An Overview
Dr. Jayant Prabhakar Bobde. ||16

04) The Important of Health and performance to improving sport skill
Kumud V. Charmode || 19

05) TWO YEAR B.ED. PROGRAMME : CHALLENGES AHEAD
Meenakshi Chatruvedi || 22

06) Bullying at workplace- An unethical Behavior
Dr. Sabrina D'souza || 28

07) ASSESSING MAMMALIAN POPULATION USING WATER-HOLE METHOD .....
FARZANA AHMED, A.K. TRIPATHI || 32

08) Plea Bargaining: A Pre-trial Negotiation
Musadir Farooq || 37

09) SEASONAL VARIATION IN WATER QUALITY OF KADAL FRESH WATER .....
Ashvin G. Godghate || 41

10) Contextualizing the Themes of Disorientation, Disruptions, .....
Ritu Gupta || 44

11) A STUDY ON CHALLENGES AND ISSUES OF 'LOCAL BODY TAX' .....
Dr. Nusrat Z. Hirani || 49

12) Kurtz- A product of colonial evil and darkness in Joseph ......
Md Masihur Rahman || 52

13) Entrepreneurship for the economic advancement
Dr. Sudhir V. Mane || 57



Scanned by TapScanner

14) Impact of GST on Common Man
**Manohar S. S.**
.................................................................................................... || 63

15) Role of Women Entrepreneurs in India
**Prof. Sudhir Vaijanathrao Panchagalle, Ms. Neeta Deshpande**
.................................................................................................... || 65

16) Listserv and its Applications in Information Dissemination .......
**P. ARUL PRAGASAM**
.................................................................................................... || 70

17) THE ROLE OF VALUES IN HUMAN LIVES
**Dr. Pramod Kumar Rajput, Dr. Madan Mohan Uniyal**
.................................................................................................... || 74

18) Health and Related Issues of Girl Child
**Dr T Sambasiva Rao**
.................................................................................................... || 77

19) Skill INDIA Challenges and Opportunities
**Dr. Prakash Ratanlal Rodiya**
.................................................................................................... || 80

20) IMPACT OF PRIVATISATION ON QUALITY IN SECONDARY EDUCATION AS .......
**Dr. Harihar Sarangi**
.................................................................................................... || 88

21) A STUDY ON CONSUMERS BEHAVIOUR TOWARDS NANDINI MILK
**Dr. SHAIKH TABASSUM HAMEED**
.................................................................................................... || 94

22) Buddhist PramâGa: An Overview
**Dr. Mukesh kumar Verma**
.................................................................................................... || 99

23) Women Empowerment through Education : Possibilities and .......
**Vibha Yadav**
.................................................................................................... || 103

24) मधुमेहीसाठी 'मल्टिग्रेन थालिपीठ' - एक विकसित अन्नपदार्थ
**डॉ. अर्चना राजेश्वर चोधरी**
.................................................................................................... || 109

25) 'तहान' कादंबरीतील ग्रामीण स्त्री चित्रण
**डॉ. नागनाथ लक्ष्मण आवले**
.................................................................................................... || 111

26) महात्मा गांधीच्या ग्राम स्वराज्य विषयक विचारांची प्रासंगिकता
**ममता मधुकरराव देशमुख**
.................................................................................................... || 114

Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar 330

http://www.vidyawarta.blogspot.com https://sites.google.com/site/vidyawartajournal



Scanned by TapScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
April To June 2018
Issue-22, Vol-06


27) संयुक्त आणि विभक्त कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचा तुलनात्मक......
संजय बबनराव चौधरी || 115

28) बिटकॉईन : एक चढ–उतार आभासी प्रमदर्शक चलनाचा आढावा
प्रा. हितेश मा. दडमल || 124

29) वसंतराव नाईक व्यक्ती आणि कार्य
डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख || 129

30) सौंदर्यात्मक मूल्यसंकल्पनाव मूल्यविधाने : एक विश्लेषण
प्रा. अजय शिंगाडे || 132

31) भारतीय शेतकरी व शेतकऱ्यांचे प्रश्न
Dr. V. V. Lade || 137

32) वारकरी संप्रदाय आणि संतश्रेष्ठ तुकाराम
डॉ.एम.पी.खेडेकर || 144

33) अंतरिक प्रेरणा हिच कर्तव्याचे स्रोत
डॉ. वेदप्रकाश डोणगावकर || 149

34) अमरावती जिल्ह्यातील उत्पादनामध्ये होणाऱ्या ज्वेलरी घडामोडीचा एक अभ्यास.
कु. सारिका प्र. धनोकार || 151

35) आशियाई देशांच्या विकासात ब्रिस बँकेचे योगदान
डॉ. संतोष तु. कुटे || 153

36) दिनेशनंदिनी डालमिया ` उपन्यासों में नारी चित्र ।
डॉ. सतोष विजय येरावार || 156

37) सिनेमा युग में रंगमंच की सार्थकता
रेणु धाकड़ || 159

38) स्वतन्त्रता पूर्व के हिन्दी उपन्यासों में मुस्लिम समाज
अरुण कुमार पाण्डेय || 161

39) मराठी लोरियों में चित्रित वात्सल्य भावना
ॉ. नीता श्रीकांत दौलतकर || 168

330

उपलब्ध केली आहे. त्याप्रमाणे समाजातील [illegible], मेळावे, व्यावसायिकांच्या मृत्यूदिवशी एक दिवस ज्वेलरी मार्केट बंद, नरहरी महाराज पुण्यतिथी, मंगल कार्याकरीता राजभवन मंगल कार्यालय इ. विविध सामाजिक कार्यात ज्वेलरी व्यावसायिक सहभागी होतात.

**३ इतर समाजातील व्यक्तीचा वाढता सहभाग**

ज्वेलरीकार व्यवसाय उभारणीस लागणारे २ लक्ष भांडवल व ज्वेलरीकलेने प्रशिक्षण केंद्राद्वारे प्रशिक्षण अशा सुविधांची पुर्तता संघटनेद्वारे होत असल्या कारणाने अमरावती ज्वेलरी बाजारातील परवानाधारक व्यावसायिका पैकी ह्र ते ६० व्यावसायिक बंगाली, मुस्लिम, मारवाडी, जैन अशा जाती—धर्म व समाजातील व्यक्तीचा सहभाग आहे. म्हणजेच ज्वेलरी व्यवसायाच्या बाजारपेठेतील स्पर्धेत ज्वेलरी काराव्यतरिक्त ४०: इतर समाजातील व्यक्तीचा सहभाग असल्याचे दिसुन आले.

**संदर्भ सुची**

१ '' सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे'' डॉ. प्रदिप आगलावे.

२ बोधनकर सुधीर, अलोणी विवेक (२००२) ''सामाजिक संशोधन पद्धती'' श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर

३ 'चक्रधर सरोदे' काळे वा. सी. (२००२) 'व्यवसाय संघटन व प्रशासन', अमरावती सेवा प्रकाशन अमरावती.

४ सोनार सराफ व्यवसाय मार्गदर्शिका महत्वाचे कायदे परीपत्रके व न्यायालयीन निर्णयासहीत लेखक त ड नं.रा. वर्मा पहिली आवृत्ती

५ सुवर्णकार प्रभात — अखिल भारतीय सुवर्णकारांचे बुलंद मासिक.

❑❑❑

330

**35**

# आशियाई देशांच्या विकासात ब्रिस बॅंकेचे योगदान

**डॉ. संतोष तु. कुटे**
अर्थशास्त्र विभाग
कला आणि विज्ञान महीला महाविद्यालय अकोला

***********

**प्रस्तावणा :—**

एकविसाव्या शतकात आशिया खंडातील देश जगात दिमाखाने वावरत असुन आपला आत्मविश्वास दाखवत आहेत.आशिया खंडातील देशामध्ये दोन विभाग करण्यात आलेले आहेत. एक म्हणजे चीन आणि भारत यांना गट आणि दुसरा म्हणजे आशियातल्या उरलेल्या देशांच्या अर्थव्यवस्था. आशियातल्या देशांच्या आर्थिक विकासाच्या कामगिरीमध्ये मोठे वैविध्य आणि विषमता आहे. त्यातही काही देश मिळून उपगट आहेत. आणि त्यांच्या विकासाच्या वाटा आणि दिशा यात साधर्म्य आहे. मात्र या सगळया देशांना जोडणारे काही समान दुवे आहेत. आपआपसातला व्यापार वाढला, गुंतवणुक वाढली आणि दळणवळणाच्या पायाभुत सुविधा वाढल्या तर आपला एक माठा व्यापार गट निर्माण होऊ शकतो. हे या देशांच्या डोळयापुढचे लक्ष्य आणि ध्येय आहे. अशी एक मोठी सामाजिक बाजारपेठ निर्माण झाली तर युरोपियन युनियनप्रमाणे आपण ही मोठी प्रगती करून घेऊ शकतो ही यामागची प्रेरणा आहे.

आशियातील देशांनी आपली बचत वाढवून आणि निर्यात व्यापार वाढवून परदेशी चलनाचे साठे मोठया प्रमाणावर गोळा केले आहेत. जुलै १९९७ मध्ये पुर्व आशियातील देशांमध्ये वित्तीय पेंचप्रसंग निर्माण झाला आणि त्यातून अनेक देश उध्वस्त व्हायची वेळ आली. या अनुभवातून शिकून या देशांनी आता आपले स्वत:चे परदेशी चलनाचे साठे भरपूर प्रमाणत



Scanned by TapScanner

…MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® | April To June 2018 Issue-22, Vol-06 | 0154

[illegible] केले आहेत. आणि आपला [illegible] [illegible] आहेत. याच आत्मविश्वासातून आता आशियातले बँकर्स एकत्रित येऊन विचार विनिमय करीत आहेत. आपल्या वित्तसंस्थांनी आणि बँकांनी शक्ती आणि स्थैर्य वाढवत आहेत. यापुढचे पाऊल म्हणजे आशियाई नाणे निधीची आवश्यकता या देशांना जाणवू लागली आहे.

व्यापाराच्या संधी आणि देवाणघेवाणींचा प्रभाव वाढू लागला आहे. त्यातूनच आशियाची संकलीत उर्जा व्यवस्था आणि व्यापार वाढण्यासाठी दळणवळणाच्या सोयी पुढे येत आहेत. भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करित असून भारतात परदेशातून भारतीय कामगारांनी मायदेशी पाठवलेला निधी अधिक आहे. भारतात सेवाक्षेत्राची निर्यात भरीव आहे. या देशांनी मिळून आसियान नावाचा गट बनवीला आहे

मागच्या २० वर्षात आशियातले देश आर्थिक वाढीची पातळी उंचावत आहेत आणि त्यातूनच त्यांची आर्थिक एकीकरणाकडे वाटचाल होत आहे .त्या देशांमधला व्यापार वाढला असुन त्या देशांचे एकमेकांवरचे परावलंबन वाढत आहे. आणि त्यातूनच या वास्तवाला एक औपचारिक संस्थात्मक स्वरूप देण्याचे प्रयत्न चालू होते. त्यातूनच आशियातले हे देश एकमेकांबरोबर मुक्त व्यापार करार करत आहेत. अशा एफटीएच्या जाळ्यातून आशियाचा आर्थिक समुदाय एकत्रित येऊन वेगळा उभा राहत आहे. आता याच देशादेशांच्या उपक्षेत्रीय पातळीवर व्यापार आणि गुंतवणूक वाढत राहिली तर एक व्यापक क्षेत्रीय चोकट बघताबघता उभी राहते आहे. यातून प्रचंड मोठी बाजारपेठ आशियातल्या सगळ्या देशांना खुली होईल आणि त्यातूनच त्यांना खूप मोठी उर्जा मिळेल आणि विकासासाठी चैतन्य मिळेल.

आशियातल्या देशांना एकमेकाबरोबर सुसंवाद साध्यासाठी आणि आपल्यातले आर्थिक सहकार्य वाढविण्यासाठी एक समान व्यासपीठाची गरज भासली त्यातुनच ईस्ट आशिया समिट ;ईएएसद्ध प्रथम डिसेंबर २००५ मध्ये कौलालमपूर, मलेशिया येथे भरली होती. यातून आता वर्षातून एकदा शिखर पातळीवरची बैठकी होऊ लागली आहेत.

आशियातल्या देशांकडील परदेशी चलनाच्या साठ्यांनी गुंतवणूक करण्यासाठी कोणतीही संस्थात्मक व्यवस्था आशियात उपलब्ध नव्हती परदेशी चलनाच्या साठ्यांना फायदा आशिया साठी होणे अपेक्षित आहे. परंतु दुसरी कोणती व्यवस्था नसल्यामुळे या साठ्यातील बराच मोठा वाटा अमेरिकेच्या टेझरी बॉन्डमध्ये गुंतवण्यात आलेला होता. या गुंतवणुकीवर मिळणारा परतावा अगदीच माफक होता. या उलट ''आशियातल्या देशांनी स्वतःचीच गुंतवणुकीची गरज खूप मोठी आहे''. अशावेळी आशियातील देशांनी बचत करून ती अमेरिकेच्या आशियातील देशांनी बचत करून ती अमेरिकेच्या चलनात गुंतवणे यात कोणताच न्याय नाही. आशियातल्या देशांचे आपल्या स्वतःच्या विकासासाठी पायाभूत सोयीसुविधांच्या गुंतवणुकीसाठी प्रचंड मोठ्या प्रमाणावर निधीची गरज आहे. या देशांचा आर्थिक विकासाचा प्रयत्नही या पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे अपुरा पडत आहे.

या सगळ्या कारणांचा विचार करता १४ ते १६ जुलैदरम्यान फोर्टेलेझा ;ब्राझिलद्ध येथे भरलेल्या सहाव्या ब्रिक्स परिषदेत भारत व चीन या दोन देशांनी परस्परांमधील मतभेद बाजूला ठेवून आर्थिक संबंधाना महत्व दिले त्याचबरोबर ब्रिक्स बँकेची स्थापना केली.

ब्रिक्स हा झपाट्याने विकसीत होत असलेल्या जगातील पाच मोठ्या अर्थव्यवस्थांचा समूह आहे. यामध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिकेचा समावेश आहे. २००८ मध्ये अस्तित्वात आलेल्या ब्रिक्स समूहात सुरवातीली चार देशांचा समावेश होता. त्यानंतर २०१० मध्ये दक्षिण आफ्रिका या समूहाचा पाचवा सदस्य बनला, ब्रिक्स देशांच्या समूहात जगातील एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोक राहतात आणि जगाच्या २५ टक्के भूभागावर ब्रिक्स देशांचा विस्तार आहे.

ब्रिक्स समूह हा विकसनशिल देशांच्या आर्थिक समश्ध्दतेसाठी स्थापन झाला आहे. ब्रिक्स बँकेची स्थापना हे जागातिक अर्थव्यवस्थेतील लक्षणीय पाऊल असून सर्व देशांच्या विकासासाठी मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार असणारी ही व्यवस्था अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.



330

बँक

'ब्रिक्स' देशांनी आपली स्वतंत्र विकास बँक स्थापन केली असून या बँकेचे वर्णन 'मिनी आय एम एफ' असे केले जात आहे. या बँकेद्वारे जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व पर्यायाने अमेरिका तसेच इतर पाश्चात्त्य देशांच्या आर्थिक दादागिरीला आव्हान दिले जाईल. या बँकेमध्ये चीनने ४१ अब्ज डॉलरची गुंतवणूक केली त्यानंतर भारत, रशिया व ब्राझील यांनी प्रत्येकी १८ अब्ज डॉलर गुंतवले आहेत. दक्षिण आफ्रिकेचा वाटा ५ अब्ज डॉलरचा आहे. ब्रिक्स बँकेचे मुख्यालय शांघाय ;चीनद्ध येथे आहे. या बँकेचे पहीले अध्यक्षपद भारताकडे आले आहे. आणि ते पुढील ६ वर्षापर्यंत राहणार आहे. त्यानंतर अनुक्रमे ब्राझील व रशियाकडे प्रत्येकी ५ वर्ष राहील. तसेच संचालक मंडळाचे पहीले अध्यक्षपद ब्राझील कडे आहे.

ब्रिक्स बँकेचा राखिव आकास्मिक निधी १०० अब्ज डॉलर राहील. सुरवातीला सर्व देश प्रत्येकी १० अब्ज डॉलरची निधी देणार व या बँकेत सर्व सदस्यांना समान अधिकार असतील हे कलम भारताने मान्य करून घेतले आहे.

ब्रिक्स बँकेचे प्रारंभिक भांडवल — १०० अब्ज
आंतरराटिय नाणेनिधीचे भांडवल — ३०० अब्ज
जागतिक बँकेचे भांडवल — ४०० अब्ज डॉलर

**ब्रिक्स बँकेची उद्‌दिष्टये**

- विकसनशील देशांना विकासकामांसाठी जागातिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज घ्यावे लागते. या दोन्ही संस्था अमेरिका व पाश्चात्य देशांच्या प्रभावाखाली काम करतात. त्यामुळे अप्रत्यक्षपणे या देशांची मर्जी राखण्याखेरीज निधी उभारणीसाठी पर्याय राहात नाही.
- पाश्चात्य देशांचे प्रभुत्व झुगारूण देणे.
- सद्स्य देशांतील पायाभूत प्रामुख्याने रस्ते बाधणी, पूल उभारणी व विमानतळ उभारणी यांचा समावेश.
- बिगर ब्रिक्स देशांनाही मदत देण्यासाठी विशेत: दिवाळखोरीच्या उंबरठयावर असलेल्या अर्जेंटिनाला मदत करण्यासाठी ब्राझीलच्या अध्यक्ष दिल्मा रोसें यांचा आग्रह
- बँक अस्तित्वात येण्याआधी सर्व सदस्य देशांच्या संसदेकडून तिला मान्यता घेणे आवश्यक.
- आफ्रिकेसाठी विभागीय केंद्र दक्षिण आफ्रीकेत असेल.
- चीन या बँकेत बिग ब्रदरची भूमिका बजावेल, अशी भीती इतर सर्व देशांना होती मात्र पहिली वीस वर्ष तरी चीनकडे या बँकेचे अध्यक्षपद नसेल

**निकर्ष** —

आशियाई देशांच्या विकासामध्ये ब्रिक्स बँकांची अतिशय महत्वाची भूमीका असून त्यामुळे आयएमफ व पर्यायाने युरोपीय देशांचे वर्चस्व कमी होईल.

आशियाई देशांना विकासासाठी नवा मार्ग मोकळा होईल. आशियातल्या देशाना एकमेकांबरोबर सुसंवाद साधण्यासाठी आणि आपल्यातले आर्थिक सहकार्य वाढविण्यासाठी एक समान व्यासपीठाची निर्माण होईल.

❑❑❑

330

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana



Scanned by TapScanner